वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती
<u>विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई</u>
अधिकृत भागभांडवलाची मर्यादा रु.२५.००कोटी
वरुन रु.१००.०० कोटी करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक -वनाम-२००३/१४६२७ /प्र.क्र २४१ /विवयो - २,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : १२ मार्च, २००४

वाचा- १) शासन निर्णय,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक- वनाम- २०००/प्र.क्र.११७/विमाया ३ , दिनांक १०.७.२००१

२) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई यांचे पत्र क्रमांक-विजाभज/२०३/२००३दिनांक १८.६.२००३

**<u>शासन निर्णय-</u>** वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ, मर्यादित, या शासन अंगीकृत उपक्रमाची निर्मिती शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक व्हीजेडब्ल्यू-१०८३/८५/का.७, दिनांक १ ऑक्टोबर १९८३ अन्वये करण्यात येऊन हे महामंडळ कंपनी कायदा १९६० खाली पंजीबध्द झालेले आहे.

२. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवलात वेळोवेळी वाढ करुन संदर्भाधीन अनुक्रमांक (१) येथील दिनांक १०.७.२००१ च्या शासन निर्णयान्वये रु.२५.०० कोटी पर्यंत वाढविण्यात आलेले आहे. या महामंडळाकडून विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींच्या उन्नतीकरीता विविध योजना राबविण्यात येतात. त्याकरीता निधी उपलब्ध व्हावा म्हणून सध्याच्या मंजूर अधिकृत भाग भांडवलात वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. आता शासन या निर्णयान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई यांचे अधिकृत भागभांडवल रु.२५.०० कोटी वरुन रु.१००.०० कोटी (रुपये शंभर कोटी फक्त) वाढविण्यास मंजूरी देत आहे.

४. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०७ / व्याऊ, दिनांक ११.३.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि. वा. मेहेर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे

पृ.मा.प.

संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, वि.मा.प्र. व इ.मा.व. कल्याण, पुणे

विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई

व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती,भटक्या जमाती विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परीक्षा)महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

~~कोषागार अधिकारी, ठाणे~~

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

अवर सचिव (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

निवड नस्ती विषयो २